नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 23/12/2023 (शनिवार) सायंकाळ

---

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध कारवाई
## वाहनासह एकुण ३,५४,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त
## पोलीस स्टेशन पारशिवनी ची कारवाई

दिनांक २१/१२/२०२३ रोजी पोलीस स्टेशन पारशिवनी येथील स्टाफ पो.स्टे पारशिवनी परिसरात पेट्रोलिंग करीत असताना मुखबीरव्दारे माहीती मिळाली की, मौजा नवेगाव खैरी ते चारगाव रोडवर नवोदय विदयालय समोर एका ट्रॅक्टर ट्रॉली मध्ये अवैध्यरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक होत आहे, अशी खात्रीशिर खबर मिळाल्याने पोलीस स्टेशन पारशिवनी येथील स्टाफ यांनी मौजा नवेगाव खैरी ते चारगाव रोडवर नवोदय विदयालय समोर दिनांक २१/१२/२०२३ चे २३.४५ वा. ते दिनांक २२/१२/२०२३ चे ००.४० वाजता दरम्यान नाकाबंदी करीत असताना महिंद्रा ट्रॅक्टर क्र. एम. एच.— २९/ए. डि— ८८१२ चा चालक **आरोपी नामे— राजेश प्रभाकर शेंद्रे, वय २९ वर्ष, रा. बच्छेरा पेच पोस्टे नवेगाव खैरी ता. पारशिवनी** हा आपले महिंद्रा ट्रॅक्टरला सलग्न बिना नंबरची ट्रॅक्टर ट्रॉलीमध्ये अवैध्यरित्या विनापरवाना पेंच नदिपात्रातुन वाळुचा उपसा करून गौण खनिज वाळुची चोरी करून वाहतुक करतांना मिळुन आल्याने नमुद आरोपीचे ताब्यातुन १) एक ब्रास रेती किंमती ४०००/— रू २) महींद्रा ट्रॅक्टर क्र. एम. एच.— २९/ ए डि—८८१२ किंमती ३,००,०००/— रू. ३) बिना नंबरची ट्रॉली किंमती ५०,०००/— रू असा एकुण ३,५४,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे— पोशि/राकेश बाबुलाल बंधाटे पोस्टे पारशिवनी यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपी विरूद्ध कलम ३७९ भा. दं. वि. सहकलम ४८ (८) महा. जमीन महसूल संहीता १९६६ अन्वये गुन्हा दाखल असुन पुढील तपास एएसआय उके बोंद्रे पोस्टे पारशिवनी मो. नं. ७३५००७१९४१ हे करीत आहे.

## घरफोडी

**पो.स्टे. रामटेक** :— अंतर्गत ०५ कि. मी. अंतरावरील महेश नगर छोरीया ले आउट रामटेक येथे दिनांक २२/१२/२०२३ चे १०.०० वा. ते १५.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— सौ. अभिषेकी योगेश भुरे, वय ३४ वर्ष, रा. महेश नगर परसोडा छोरीया ले आउट ही घराला लॉक लावून घराबाहेर गेली असता कोणीतरी अज्ञात आरोपी याने फिर्यादीच्या घराचे लॉक तोडून घराच्या आत प्रवेश करून बेडरूम मध्ये ठेवलेल्या लोखंडी आलमारी मधील लॉकर मध्ये स्टीलच्या डब्यात ठेवलेले नगदी ४२०००/— रू. व चांदीच्या २ पायपट्टया किंमती ३८००/— रू. असा एकुण ४५८००/— रूपयाचा मुद्देमाल चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक लांजेवार मो. क्र. ९७६४१९०९५१ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**